दिनांक १८/०५/२०२६

# प्रेस नोट

## पश्चिम बंगाल येथील पाहिजे आरोपींना गुन्हे शाखेकडून ताब्यात घेतलेबाबत

बेरहामपुर, जिल्हा मुर्शिदाबाद, राज्य पश्चिम बंगाल येथील संवेदनशील परिसरात बॉम्ब फेकल्याबाबत अज्ञात व्यक्तींविरुदध बेरहामपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७२६/२६, कलम १२६(२), ३२४ (४), ३५१(३), ३(५), भारतीय न्याय संहिता, २०२३ सह कलम ३, ४ स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील संशयित व्यक्ती गुन्हा केल्यानंतर बेरहामपुर येथून पळून गेल्या होत्या. कोलकाता येथून मुंबई येथे गितांजली एक्सप्रेसने नमूद आरोपित इसम हे रेल्वे प्रवास करणार असल्याची खात्रीलायक बातमी गुन्हे शाखेस दिनांक १६/०५/२०२६ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार मा. वरिष्ठांच्या आदेशाने नमूद पाहिजे आरोपींचा शोध घेणेकामी गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष ५ यांचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. सदर शोधमोहीमे दरम्यान दादर ते बोरीवली रेल्वे स्थानकापर्यंत सापळा रचून, दोन संशयित इसमांना बोरिवली रेल्वे स्थानक येथे संयुक्त पथका कडून शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

नमूद इसमांकडे सखोल चौकशी केली असता त्यांचा वरील नमूद गुन्हयात सहभाग असल्याचे उघडकीस आले. बेरहामपुर पोलीस ठाणे यांचे एक विशेष पथक मुंबईत येवून, त्यांनी दोन्ही आरोपींचा ताबा घेतला. दिनांक १७/०५/२०२६ रोजी दोन्ही आरोपींना मा. अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, सुट्टीचे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे हजर करण्यात आले असता, त्यांना मा. न्यायालयाने ट्रान्झिस्ट रिमांड मंजूर केले आहे.

<u>ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपितांची माहिती-</u>

१) रॉकी खान, वय २३ वर्षे, रा.ठि. बेरहामपूर, जिल्हा मुर्शिदाबाद, राज्य पश्चिम बंगाल

२) शाहदत सरकार, वय ३५ वर्षे, रा.ठि. बेरहामपूर, जिल्हा मुर्शिदाबाद, राज्य पश्चिम बंगाल

सदरची प्रभावी कामगिरी गुन्हे शाखा, मुंबई पथकाने मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डी (विशेष) श्री. सदानंद राणे तसेच गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष-५ मधील अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीपणे पार पाडली.